# जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांचे आस्थापनेवरील लिपिक-टंकलेखक संवर्गातील तसेच उपविभागीय अधिकारी यांचे आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात

**क्रमांक आस्थापना-१/तलाठी/लिपिक/सीआर-०८/२०१५, दिनांक १६/०६/२०१५**

शासन, वित्त विभाग निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दिनांक ०२/०६/२०१५ अन्वये गट-क संवर्गातील सरळसेवेची रिक्त पदे नमूद टक्केवारीनुसार भरणेबाबतचे आदेश दिले आहेत.

सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने मा. उप सचिव, महसूल व वन विभाग, (ई-७) मंत्रालय, मुंबई यांजकडील पत्र क्रमांक भरती/२०१५/प्र.क्र.४०३/ई-७, दिनांक ०४/०६/२०१५ अन्वये महसूल विभागातील लिपिक-टंकलेखक व तलाठी सवंर्गातील रिक्त पदे उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमूद सूचनांनुसार सरळसेवेने भरण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यानुसार सदर पदाकरीता पात्र व इच्छुक उमेदवारांकडून **फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.**

| पदाचे नांव | प्रवर्ग | पदसंख्या | समांतर आरक्षण | | | समांरत आरक्षण विरहीत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | अंशकालिन उमेदवार | |
| लिपिक-टंकलेखक (गट-क) | अनुसूचित जमाती | २ | १ | ० | ० | १ |
| | भटक्या जमाती (क) | १ | ० | ० | ० | १ |
| | इतर मागास वर्ग | ६ | २ | १ | १ | २ |
| | **एकूण** | **९** | **३** | **१** | **१** | **४** |

| पदाचे नांव | प्रवर्ग | पदसंख्या | समांतर आरक्षण | | | समांरत आरक्षण विरहीत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | अंशकालिन उमेदवार | |
| तलाठी (गट-क) | अनुसूचित जाती | ६ | २ | ० | ० | ४ |
| | अनुसूचित जमाती | २ | ० | ० | ० | २ |
| | विमुक्त जाती (अ) | १ | ० | ० | ० | १ |
| | भटक्या जमाती (ड) | १ | ० | ० | ० | १ |
| | इतर मागास वर्ग | ९ | २ | १ | ० | ६ |
| | खुला | १५ | ४ | २ | १ | ८ |
| | **एकूण** | **३४** | **८** | **३** | **१** | **२२** |

## १. टिप सर्व पदांसाठी :-

१. **शासन, महसूल व वन विभाग व सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन या प्रशासकीय विभागाकडून होणाऱ्या प्रचलीत शासन परिपत्रक व निर्णयावर वरील नमूद पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.**

२. अतिरिक्त संवर्ग, आंतरविभागीय समायोजन, विभागीय बदली व इतर विभागातील पदांचा आढावा इत्यादी व अन्य कारणामुळे पदसंख्येत (पदसंख्या कमी किंवा जास्त होणे) व आरक्षण/समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

३. नियुक्ती देणेचे नियमात, पदसंख्येत/आरक्षणात बदल करणे, रद्द करणेचे, परीक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, बदल करणे याबाबतचे अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना राहतील. याबाबत कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

४. शासनाने भरतीबाबत/नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक, आदेश इत्यादी भरती प्रक्रियेला लागू राहतील.

५. **अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवास/रहिवासी असावा. वरील पदासाठी आवश्यक अर्हता प्राप्त करणा-या महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकतो.**

६. **वरील नमूद टिप क्रमांक १ व ६ याबाबतीत अध्यक्ष, जिल्हा निवड समितीचा निर्णय अंतिम असेल. पदांच्या संख्येबाबत उमेदवारांचे कोणतेही अपिल अथवा तक्रार यांचा विचार केला जाणार नाही, याची उमेदवारांनी अर्ज भरतांना नोंद घ्यावी.**

## २. वेतनश्रेणी :-

**१. लिपिक-टंकलेखक संवर्ग** - सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन श्रेणी रुपये ५२००-२०२०० (पी.बी.- १) ग्रेड पे रुपये १९०० अधिक नियमानुसार देय भत्ते.

**२. तलाठी संवर्ग** - सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन श्रेणी रुपये ५२००-२०२०० (पी.बी.- १) ग्रेड पे रुपये २४०० अधिक नियमानुसार देय भत्ते.

## ३. पात्रतेच्या अटी :-

**३.१ वयोमर्यादा - (दिनांक ३१/०५/२०१५ रोजीची गणली जाईल)**

**३.१.१** उमेदवाराचे वय खुल्या वर्गासाठी किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे इतके राहील.तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे राहिल.

**३.१.२** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम आहे. खालील समांतर आरक्षणातील व या जाहिरातीतील मसुद्यात नमूद प्रवर्गातील उमेदवार अर्ज करु शकतात.

(एक) मागासवर्गीय उमेदवारांकरीता कमाल ३८ वर्षापर्यन्त.

(दोन) प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांकरिता ४५ वर्षांपर्यंत

(तीन) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंचे वय ३८ वर्षे (सर्वसाधारण) व ४३ वर्षे (मागासवर्गीय) पेक्षा जास्त नसावे.

(चार) स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी उमेदवारांना ४५ वर्षे

(पाच) अपंग उमेदवारांकरिता ४५ वर्षे

(सहा) माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ मधील पदांसाठी नेमणूकीकरीता विहीत वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील.

(सात) अपंग माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ मधील पदांसाठी नेमणूकीकरीता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे पर्यन्त राहील.

(आठ) पदवीधर/पदविकाधारक अंशकालिन उमेदवारांकरीता ४६ वर्षे.

**३.२ शैक्षणिक अर्हता - (दिनांक ३१/०५/२०१५ रोजी पूर्ण केली असली पाहिजे)**

| पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|
| लिपिक-टंकलेखक | १. माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण. |
| | २. मराठी टंकलेखनाची एका मिनिटाला किमान ३० शब्द या गतीची शासकीय वाणिज्य मंडळाची प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. (शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक निवक-१०१०/प्र.क्र.८/२०१०/१६-अ, दिनांक ०६/१०/२०१० नुसार भूकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी व पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या घटकातील उमेदवारांना मराठी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिने इतक्या कालावधीमध्ये तसेच माजी सैनिक उमेदवारांनी नियुक्ती दिनांकापासून अकरा महिने इतक्या कालावधीतध्ये सदर प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.) |
| | ३. मराठी, हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील. |

| | | |
|---|---|---|
| **तलाठी** | १. संविधानीक विद्यापीठाची पदवी तसेच शासनाने त्याच्याशी समतूल्य म्हणून जाहिर केलेली अन्य अर्हता. | |
| | २. मराठी, हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील. | |

**३.३ संगणक अर्हता -**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक प्रशिक्षण - २०००/प्र.क्र.६१/ २००१/३९, दिनांक १९ मार्च, २००३ नुसार संगणक अर्हता (एम.एस.सी.आय.टी.) नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत धारण करणे बंधनकारक राहील.

**३.४ अतिरिक्त शैक्षणिक अर्हता -**

**३.४.१** उमेदवारास विभागीय परिक्षा तसेच हिंदी व मराठी परिक्षा तत्संबंधी नियमानुसार परिक्षा पूर्वीच उत्तीर्ण झाला नसल्यास किंवा त्या उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आली नसल्यास त्याला/तिला परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल.

**३.४.२** उमेदवाराने राज्य शासनाच्या माहिती तंत्राज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक वापराबाबतचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

## ४. अर्जासोबत शुल्क (फी) :-

**४.१**

| पदाचे नांव | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|
| लिपिक-टंकलेखक | ३००/- | १५०/- |
| तलाठी | | |

**४.२** वर दर्शविण्यात आलेले परीक्षा शुल्क हे बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे. सदर परीक्षा शुल्क **स्टेट बँक ऑफ इंडियाच्या** कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी प्राप्त झालेल्या चलनाद्वारेच रोखीने भरणे आवश्यक आहे. याशिवाय स्टेट बँक ऑफ इंडियाकडून रुपये **६०/-** इतके प्रक्रिया शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे. सदर परीक्षा शुल्काची रक्कम ही नापरतावा असेल.

**४.३** **माजी सैनिकांना परीक्षा शुल्क माफ आहे.**

## ५. अर्ज करण्याची पध्दत :-

**५.१** प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

**५.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (web-based) ऑनलाईन अर्ज http://Collrtn.govtjobs.com या लिंकवर सादर करणे आवश्यक राहील. तसेच सदर लिक www.ratnagiri.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

**५.३** उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चूकीचा/अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, रत्नागिरी हे जबाबदार असणार नाहीत. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

**५.४** उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना, शैक्षणिक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवारांनी त्यांच्या

पात्रतेनुसार संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चूका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही.

५.५ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराजवळ स्वतःचा ई-मेल आयडी असणे बंधनकारक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडी द्वारे होणार असल्याने अचूक ई-मेल आयडी नोंदविणे बंधनकारक आहे व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. तसेच स्वतःचा अद्ययावत विहित पासपोर्ट साईज फोटो व सही स्कॅन करुन http://Collrtn.govtjobs.com या लिंकवरील सूचनेनुसार अपलोड करणे अनिवार्य आहे. अपलोड करताना फोटोची व सहीची प्रत्येकी साईज ४० केबीपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांनी परीक्षेच्या दिवशी फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र सोबत आणणे बंधनकारक आहे.

५.६ उमेदवारांची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन मूळ कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे अधिकार जिल्हा निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

५.७ ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याच्या सविस्तर सूचना http://Collrtn.govtjobs.com या लिंकवर उपलब्ध आहेत. उमेदवाराने http://Collrtn.govtjobs.comया लिंकवर ऑनलाईन अर्ज भरण्यास सुरुवात करण्यापूर्वी परीक्षा शुल्क बँक चलनाद्वारे भरणे आवश्यक आहे. त्यानुसार उमेदवार वरील संकेतस्थळावरुन बँक चलनाचा नमुना तीन प्रतींमध्ये डाऊनलोड करुन प्रिंट काढून घेईल व त्यातील आवश्यक माहिती भरुन चलनात नमूद असलेले परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये भरणा करेल व सदर शाखेकडून चलनावर रक्कम जमा झालेबाबत Transaction ID नमूद केला जाईल. तसेच चलनाच्या तीन प्रतींपैकी उमेदवारास त्याची स्वतःची प्रत व या कार्यालयाची प्रत शाखेकडून परत देण्यात येईल. त्यानंतर उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरुन अर्जाची प्रिंट काढून ठेवावी व इंटरनेटवर उपलब्ध होणारा नोंदणी क्रमांक जपून ठेवावा. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये परीक्षा शुल्क जमा केले म्हणजे लेखी परीक्षेसाठी अर्ज पात्र ठरला असे गृहीत धरण्यात येऊ नये. उमेदवाराने सदर अर्जाची प्रिंट व चलन भरल्याची या कार्यालयाची मूळ प्रत कागदपत्र छाननीचे वेळी जिल्हा निवड समितीकडे जमा करणे बंधनकारक आहे. सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवारांची कागदपत्रे छाननी केली जाणार नाहीत.

५.८ उमेदवाराने स्टेट बॅंक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत पैसे भरलेनंतर त्याची स्थिती http://Collrtn.govtjobs.com या लिंकवर पहाता येऊ शकेल.

५.९ ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवाराची स्थिती/परीक्षा प्रवेशपत्र/वेळापत्रक/परीक्षा केंद्र/बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या वेबसाईटवर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

५.१० अपंग उमेदवारांस लेखी परीक्षेच्यावेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास ऑनलाईन अर्ज भरतांना तसा स्पष्ट उल्लेख करावा व विहित नमुन्यामध्ये अर्ज भरुन मुदतीमध्ये या कार्यालयाकडे सादर करावा. विहित नमुन्यातील अर्ज http://Collrtn.govtjobs.comया लिंकवर उपलब्ध आहे. ज्या उमेदवारांनी अर्जात लेखनिकाची मागणी केलेली नसेल अशा अपंग उमेदवारांना ऐनवेळेस लेखनिक पुरविला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**५.११** उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर http://Collrtn.govtjobs.comया लिंकवरुन परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे. कोणत्याही उमेदवारास पोष्टाद्वारे प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही व प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास प्रवेश दिला जाणार नाही.

## ६. परीक्षेचे स्वरुप :-

**६.१ लिपिक-टंकलेखक पदाकरिता** कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण (एस.एस.सी.) आहे. अशा पदाकरिता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल. व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नाकरिता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल. सदर परीक्षा इंग्रजी विषय वगळता अन्य विषयांची परीक्षा मराठी भाषेतून घेण्यात येईल.

**६.२ तलाठी पदाकरिता** कमीत कमी अर्हता पदवी आहे. अशा पदाकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) च्या दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नाकरीता प्रत्येकी ५० गुण असून एकुण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.

**६.३ लिपिक-टंकलेखक/तलाठी पदाकरिता** शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/ प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक २७/०६/२००८ मधील मुद्दा ५ नुसार गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

**६.४ लिपिक-टंकलेखक/तलाठी पदाकरिता** उमेदवारांची निवड करताना मुलाखती न घेता फक्त लेखी परिक्षा घेवून लेखी परिक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवड यादी तयार करुन निवड यादीतील उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

**६.५ लिपिक-टंकलेखक/तलाठी पदाकरिता** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग,क्र.प्रानिमं२०१०/२०९/प्र.क्र.६६/ १०/१३-अ, दिनांक १९ जून, २०१० अन्वये उमेदवारांनी उत्तरे लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकीत करण्यासाठी फक्त काळ्या शाईच्या बॉलपेनचा वापर करण्याचा आहे. अन्य कोणत्याही साधनाचा वापर केल्यास संबंधित उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

## ७. परिक्षेचा निकाल :-

**परीक्षेचा निकाल तयार करताना परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र. ४६/०७/ १३-अ, दिनांक २७ जून, २००८ मधील मुद्दा क्रमांक ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे खालील निकषांवर क्रमवार लावला जाईल.**

**७.१** अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार त्यानंतर

**७.२** मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमाती मधील नंतर अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती, जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जमाती ), भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागासवर्ग या क्रमाने, त्यानंतर

**७.३** शारिरीक दृष्टया अपंग असलेले उमेदवार, त्यानंतर

**७.४** माजी सैनिक असलेले उमेदवार, त्यानंतर

**७.५** स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य असलेले उमेदवार, त्यानंतर

**७.६** वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारांचा क्रम वरती लागेल.)

वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

**८. स्पर्धा परीक्षा रत्नागिरी केंद्रावर घेण्यात येईल. परंतु, उमेदवारांची संख्या जास्त असल्यास अन्य तालुक्यातील उपकेंद्रावर घेण्यात येईल.**

## ९. पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती, अटी व शर्ती :-

९.१ उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्र तसेच अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. परंतु ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रुटी राहिल्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहिल व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. **तसेच ऑनलाईन अर्ज भरतांना खोटी किंवा विसंगत/दिशाभूल माहिती भरलेचे निदर्शनास आल्यास संबंधित उमेदवारावर फसवणूकीचा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.**

९.२ उमेदवाराची लेखी परीक्षा ही कोणत्याही कागदपत्रांची पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे हया परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. **कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक/समांतर आरक्षणनिहाय अंतिम निवड करण्यात येईल.**

९.३ गुणवत्ता यादीमध्ये येणा-या उमेदवारांना मूळ कागदपत्रांची तपासणी करणेकरीता बोलविण्यात येईल. उमेदवारांनी कागदपत्रे तपासणीच्या वेळी मूळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननी अंती प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास अथवा माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही.

९.४ उक्त पदांसाठी छाननी न करता जाहिरातीनुसार परिपूर्ण अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी परीक्षा केंद्राचा सांकेतांक क्रमांक, वेळ व दिनांक इत्यादी तपशिल http://Collrtn.govtjobs.com या लिंकवर उपलब्ध होईल. लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र http://Collrtn.govtjobs.com या लिंकवरुन प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

९.५ लेखी परीक्षा व मूळ कागदपत्रांच्या छाननीसाठी उमेदवारांस स्वखर्चाने यावे लागेल.

९.६ जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र, रत्नागिरी या कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक. आहे.

९.७ महिला या समांतर आरक्षणात लेखी परीक्षेअंती पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे त्याच सामाजिक आरक्षणातील/प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.त्यामुळे या आरक्षणातील/प्रवर्गातील पुरुष उमेदवार अर्ज करण्यास पात्र ठरतील.महिला उमेदवार पात्र असल्यास गुणवत्तेनुसार पुरुष उमेदवार पात्र असून ही विचारात घेतला जाणार नाही.

९.८ समांतर आरक्षणामधून अर्ज करणा-या उमेदवाराने एकदा समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास पुन्हा दुस-या पदावर नोकरी मिळविण्यासाठी त्याच समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही.

## १०. उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीचे वेळी खालील मूळ कागदपत्रे व त्यांच्या साक्षांकित प्रती सादर करणे बंधनकारक आहे.

१०.१ **सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१२७/(२०००)/१२, दि.२८/०३/२००५ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही/२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक १ जुलै, २००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापन विवाहित/अविवाहित उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक आहे. विहित नमुना** http://Collrtn.govtjobs.com **या लिंकवर उपलब्ध आहे.**

१०.२ शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभाग प्रमुखांच्या परवानगीने भरले असल्यास अशा परवानगीचे ना-हरकत पत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१०.३ किमान शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्याच्या प्रमाणपत्राची प्रत सादर करणे बंधनकारक आहे. माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण झाल्यानंतर उमेदवाराच्या नावात कोणताही बदल झाला असल्यास, त्या पुष्टयर्थ संबंधित शासन राजपत्रांची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

१०.४ उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व, वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड),वि.मा.प्र. व इ.मा.व. ह्या प्रवर्गांना लागू करण्यात आले आहे. त्यानुसार उक्त प्रवर्गातील उमेदवारांनी शासन परिपत्रक क्रमांक सीबीसी १०/२००६/प्र.क्र.१५/मावक ५, दिनांक ३० जून,२००६ मधील सोबतच्या नमुन्यात वर्ष २०१५-२०१६ ह्या (चालू वित्तिय वर्षाचे) कालावधीकरिता वैध असलेले **(अर्थात दिनांक ०१/०४/२०१५ पासून अथवा तद्नंतर निर्गमित केलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर)** प्रमाणपत्र हे मूळ कागदपत्रांच्या छाननी वेळी सादर करणे बंधनकारक आहे.

१०.५ मागासवर्गीय उमेदवार ज्या प्रवर्गातून अर्ज करीत असेल त्या प्रवर्गाचे सक्षम प्राधिका-याने दिलेले जात/जमाती प्रमाणपत्राची प्रत सादर करणे बंधनकारक आहे.

१०.६ उमेदवार ज्या समांतर आरक्षणामधून अर्ज करीत असेल त्या समांतर आरक्षणाबाबतचे सक्षम प्राधिका-याने दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत जोडणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्राच्या आधारे उमेदवाराला संबंधित समांतर आरक्षणातील वयोमर्यादेतून सूट मिळणार आहे. याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१०.७ अपंग उमेदवाराने अपंगत्वाचे (किमान ४० टक्के) विहीत नमून्यातील जिल्हा शल्यचिकित्सक/ वैद्यकीय मंडळ यांच्या प्रमाणपत्राची प्रत सादर करणे बंधनकारक आहे.

१०.८ **लिपिक-टंकलेखक पदाकरीता** मराठी टंकलेखनाची एका मिनिटाला किमान ३० शब्द या गतीची शासकीय वाणिज्य मंडळाची प्रमाणपत्र परिक्षा दिनांक ३१/०५/२०१५ अखेरपर्यंत उत्तीर्ण असल्याच्या प्रमाणपत्राची प्रत सादर करणे बंधनकारक आहे.

१०.९ अंशकालिन उमेदवाराने शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यन्त दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार व स्वयंरोजगार मागदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१०.१० माजी सैनिक उमेदवारांनी डीसचार्ज बुकाची मूळ प्रत सादर करणे बंधनकारक आहे.

१०.११ महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/ का-२, दिनांक २५/०५/२००१ अन्वये खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता शासकीय सेवेत ठेवण्यात आलेल्या तीस टक्के आरक्षणाच्या सवलतीकरीता उन्नत व्यक्ती/गट (क्रिमिलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे वर्ष २०१५-१६ हया कालावधीचे **(अर्थात दिनांक ०१/०४/२०१५ पासून अथवा तद्नंतर निर्गमित केलेले)** प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. अन्य प्रवर्गातील महिलांना, महिलांसाठी राखीव पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास, त्यांनी वरील शासन निर्णय दिनांक २५/०५/२००१ मधील तरतूदी अवलोकनात घ्याव्यात.

१०.१२ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक ३०/४/२००५ मधील अ.क्र.४ (क) मध्ये विहीत केलेली अर्हता धारण करीत असलेल्या अत्युच्च्य गुणवत्ताधारक खेळाडू उमेदवाराने त्याबाबतची क्रिडा/खेळ विषयक प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१०.१३ प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांनी त्याबाबतच्या वैध प्रमाणपत्राची प्रत सादर करणे बंधनकारक आहे.

१०.१४ महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्राची (डोमेसाईल) प्रत सादर करणे बंधनकारक आहे.

१०.१५ शाळा सोडल्याच्या दाखल्याची/प्रमाणपत्राची प्रत सादर करणे बंधनकारक आहे.

## ११. पात्रतेनंतरच्या अटी व शर्ती :-

११.१ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१६४/२०११/१६-ब, दिनांक १२/१२/२०११ अन्वये मागासवर्गीय उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत आपल्या जात/जमाती प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक आहे.

११.२ नियुक्ती होणा-या उमेदवारास शासन निर्णय दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नुसार लागू करण्यात आलेली अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

११.३ निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात नमूद केलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे नंतर निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

११.४ अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची रत्नागिरी जिल्हा आस्थापनेच्या अधिपत्याखालील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती देण्यात येईल. नियुक्तीच्या आदेशातील अटी व शर्तींचे पालन करणे उमेदवारास बंधनकारक असेल.

११.५ जिल्हा निवड समितीने तयार केलेल्या अंतिम निवडसूची मधून गुणक्रमानुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार किंवा जात प्रमाणपत्र किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवडसूचीतील ज्येष्ठतेनुसार/गुणानुक्रमानुसार किंवा अतिरिक्त निवड केलेल्या उमेदवारांच्या यादीतील ज्येष्ठतेनुसार/गुणानुक्रमानुसार (संबंधित प्रवर्ग/समांतर आरक्षणातील निवड यादीतील गुणानुक्रमानुसार/ज्येष्ठतेनुसार) उमेदवाराची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात येईल. अतिरिक्त निवड यादीमधील उमेदवार हे वरील नमूद कारणास्तव अंतिम निवड झालेला उमेदवार अपात्र ठरला तरच अतिरिक्त निवड यादीमधील उमेदवाराची शिफारस करण्यात येईल. निवडसूची तयार करताना विचारात घेतलेल्या रिक्त पदांच्या व्यतिरिक्त नंतर रिक्त झालेल्या पदांसाठी निवड सूचीतील उमेदवारांची शिफारस करण्यात येणार नाही. नियुक्तीचे ठिकाणी उमेदवारांना स्वखर्चाने जाऊन हजर होणे अनिवार्य आहे.

११.६ शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक २७ जून,२००८ अन्वये जिल्हा निवड समितीने तयार केलेली निवड सूची एक वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यन्तची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यन्त,जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यन्त विधीग्राह्य ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. अगर निवड यादीला १ वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच या आस्थापनेवरील वरील संवर्गातील नविन जाहिरात प्रसिध्द झाल्यास अतिरिक्त निवड यादीतील उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

११.७ अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना रुजू झाल्यानंतर विहीत केलेल्या संबंधित विभागांच्या परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसेच हिंदी व मराठी परिक्षा तत्संबंधी नियमानुसार परिक्षा पूर्वीच उत्तीर्ण झाला नसल्यास त्याला/तिला परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल.

११.८ निवड झालेल्या उमेदवाराने राज्य शासनाच्या माहिती तंत्राज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक वापराबाबतचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

११.९ मूळ प्रमाणपत्रांची खातरजमा केल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजू करुन घेण्यात येईल.

११.१० निवड झालेल्या उमेदवारांची चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी करण्यात येईल.

११.११ **तलाठी पदाकरीता** अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना प्रथम सहा महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात येईल. सदरच्या कालावधीमध्ये ते परिविक्षाधीन कर्मचारी म्हणून गणले जातील व सदरचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतरच त्यांना तलाठी पदावर नियमित पदस्थापना संबंधित उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत देण्यात येईल.

## १२. विशेष सूचना :-

१२.१ उमेदवारांनी वरील नमूद संकेत स्थळावर प्रसिध्द केलेल्या पात्र व अपात्र यादीबाबतचे आक्षेप **दिनांक ०७/०७/२०१५ पर्यंत लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी व दिनांक १३/०७/२०१५ पर्यंत तलाठी संवर्गासाठी** जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती रत्नागिरी यांचे नांवे पाठविण्याचे आहेत. **विहीत दिनांकानंतर या कार्यालयाकडे प्राप्त होणारे आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.**

१२.२ लेखी परिक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांनी त्यांची पात्रता ज्या प्रवर्गातून व समांतर आरक्षणातून झालेली आहे. याबाबतची खात्री वरील संकेत स्थळावर प्रसिध्द केलेल्या पात्र यादीमध्ये पहाणे बंधनकारक आहे. **वरील अ.क्र.१२.१ नमूद दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार असल्याने उमेदवाराने वेळीच पात्र व अपात्र यादी संकेत स्थळावर पहाणे बंधनकारक आहे.**

१२.३ महिला उमेदवारांनी पूर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

१२.४ फक्त याच जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने या कार्यालयास प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

१२.५ अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

१२.६ उमेदवारांने http://Collrtn.govtjobs.comया लिंकवर पात्र/अपात्र उमेदवारांची यादी विहीत मुदतीत पहाणे बंधनकारक राहील. त्यामुळे उमेदवाराकडून कोणत्याही कारणामुळे याबाबतीत झालेला विलंब ग्राहय धरला जाणार नाही.

१२.७ उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी, दूरध्वनी/मोबाईल क्रमांक बदलल्यामुळे अथवा बंद केल्यामुळे परीक्षेची संधी हुकल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१२.८ प्रथम अंतरिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. आक्षेप/हरकतींचा विचार करुन व मूळ कागदपत्रांची छाननी अंती अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल.

१२.९ या परीक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करावयाची आवश्यकता नाही. तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करु नयेत.

**१२.१० अर्जदारांना अर्ज भरण्या संदर्भात काही अडचणी आल्यास त्यासाठी ७३८७७०८६५९९ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.**

## लिपिक-टंकलेखक संवर्गातील ऑनलाईन भरती प्रक्रियेचा कार्यक्रम

| अ.क्र. | भरती प्रक्रिया कार्यक्रम | संभावित दिनांक |
|---|---|---|
| १ | **अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी** | **दिनांक १६/०६/२०१५ ते ०१/०७/२०१५** रोजी रात्री ११.५५ वाजेपर्यंत |
| २ | **बँकेत विहित चलनाद्वारे परीक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक ३०/०६/२०१५** रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत |
| ३ | लेखी परीक्षेसाठी पात्र/अपात्र यादी प्रसिध्द दिनांक | **दिनांक ०५/०७/२०१५** |
| ४ | लेखी परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | **दिनांक ०७/०७/२०१५** पासून लेखी परीक्षेच्या दिनांका पर्यंत |
| ५ | **लेखी परीक्षा** | **दिनांक १२/०७/२०१५ सकाळी ११.०० ते १२.३०** |

## तलाठी संवर्गातील ऑनलाईन भरती प्रक्रियेचा कार्यक्रम

| अ.क्र. | भरती प्रक्रिया कार्यक्रम | संभावित दिनांक |
|---|---|---|
| १ | **अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी** | **दिनांक १६/०६/२०१५ ते ०१/०७/२०१५** रोजी रात्री ११.५५ वाजेपर्यंत |
| २ | **बँकेत विहित चलनाद्वारे परीक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक ३०/०६/२०१५** रोजी बॅकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत |
| ३ | लेखी परीक्षेसाठी पात्र/अपात्र यादी प्रसिध्द दिनांक | **दिनांक १०/०७/२०१५** |
| ४ | लेखी परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | **दिनांक १३/०७/२०१५** पासून लेखी परीक्षेच्या दिनांका पर्यंत |
| ५ | **लेखी परीक्षा** | **दिनांक १९/०७/२०१५**<br>**सकाळी ११.०० ते १२.३०** |

**सही/- राधाकृष्णन बी**
**जिल्हाधिकारी रत्नागिरी तथा**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती रत्नागिरी**

## अपंग उमेदवारांना विशेष सूचना

लिपिक-टंकलेखक/तलाठी पदाच्या लेखी परीक्षेसाठी अपंग उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी लेखनिकाची मदत ही या कार्यालयाच्या परवानगीने घेता येईल. यासाठी लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या अपंग उमेदवारांने खालील नमुन्यामध्ये प्रमाणपत्र देण्याचे आहे. तसेच मदतनीस लेखनिकाने ही त्याबाबत द्यावयाचे प्रमाणपत्र हे दोन पासपोर्ट साईज फोटो व ओळख पुराव्यासह (निवडणूक ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड इत्यादि) खालील नमून्यामध्ये देण्याचे आहे.

### प्रमाणपत्र

### लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेदवाराने द्यावयाचे प्रमाणपत्र

१. उमेदवाराचे नांव व बैठक क्रमांक - ------------------------------------------------------------

२. लेखनिकाचे नांव - ------------------------------------------------------------

३. लेखनिकाचा पत्ता - ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

४. उमेदवाराची शैक्षणिक अर्हता - ------------------------------------------------------------

५. लेखनिकाची शैक्षणिक अर्हता - ------------------------------------------------------------

६. उमेदवार व लेखनिक एकाच विद्या शाखेचे आहेत का? - ------------------------------------------------------------

७. असल्यास, लेखनिक उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एक पायरी/टप्पा कमी आहे का? - ------------------------------------------------------------

मी असे प्रमाणित करतो/करते की, लेखनिकाबाबत मी दिलेली उपरोक्त माहिती माझ्या माहितीप्रमाणे बरोबर असून सदर प्रमाणपत्रात नमूद केलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास ह्या माहितीच्या आधारे उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द केल्यास त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**उमेदवाराची स्वाक्षरी**

### लेखनिकाने द्यावयाचे प्रमाणपत्र

१. उमेदवाराचे नांव व बैठक क्रमांक - ------------------------------------------------------------

२. लेखनिकाचे नांव - ------------------------------------------------------------

३. लेखनिकाचा पत्ता - ------------------------------------------------------------

४. उमेदवाराची शैक्षणिक अर्हता - ------------------------------------------------------------

५. लेखनिकाची शैक्षणिक अर्हता - ------------------------------------------------------------

६. उमेदवार व लेखनिक एकाच विद्या शाखेचे आहेत का? - ------------------------------------------------------------

७. असल्यास, लेखनिक उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एक पायरी/टप्पा कमी आहे का? - ------------------------------------------------------------

**लेखनिकाची स्वाक्षरी**

## लिपिक -टंकलेखक/तलाठी पदाकरीता लेखी परीक्षेसाठी पात्र उमेदवारांसाठी लेखनिकासंदर्भातील प्रमुख सूचना/अटी खालील प्रमाणे आहेत.

१. अपंग उमेदवाराने आणलेला लेखनिक व उमेदवार एकाच विद्या शाखेचे असल्यास, लेखनिक अपंग उमेदवार धारण करीत असलेल्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एक पायरी/टप्पा कमी असणे आवश्यक आहे.

२. लेखनिकास मराठी व इंग्रजी चांगल्या प्रकारे लिहिता, वाचता येणे आवश्यक आहे.

३. लेखनिकाचे अक्षर सुवाच्च असावे.

४. लेखनिकास श्रवण दोष नसावा.

५. **लेखनिकाची मदत घेवून परीक्षेस बसलेल्या अपंग उमेदवारांना पेपर लिहिण्यासाठी प्रत्येक तासास २० मिनिटे याप्रमाणे दिड तासासाठी ३० मिनिटांचा अतिरिक्त वेळ देण्यात येईल.**

६. प्रस्तूत परीक्षा वस्तूनिष्ठ बहूपर्यायी स्वरुपाची आहे. उमेदवार जे तोंडी उत्तर सांगेल तेच अचूकपणे लेखनिकाने उत्तरपत्रिकेत लिहावे. याखेरीज परीक्षा कालावधीत इतर कोणतीही चर्चा लेखनिकाबरोबर अपंग उमेदवाराने करता कामा नये.

७. इतर सामान्य सूचना वरील प्रमाणपत्रावर तसेच उमेदवाराच्या प्रवेशपत्रावर नमूद केल्या आहेत. त्याचे काळजीपूर्वक पालन करावे.

## लेखनिकांना सूचना

१. लेखनिकाने परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी १ तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहून जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेले नियुक्तीपत्र केंद्रप्रमुखांना स्वाधीन करावे.

२. लेखनिकाने स्वतःचे काळ्या शाईचे बॉलपाईन्ट पेन आणावे. याखेरीज अन्य कोणत्याही रंगाची शाई किंवा पेन्सिल वारण्यास मनाई आहे.

३. प्रस्तूत परीक्षेचा एक पेपर असून सदर पेपर वस्तूनिष्ठ बहूपर्यायी स्वरुपाचा आहे. वस्तूनिष्ठ स्वरुपाच्या पेपरच्यावेळी उमेदवार जे तोंडी उत्तर सुचविल ते लेखनिकाने उत्तरपत्रिकेत अचूक ठिकाणी नमुना उत्तरपत्रिकेत दर्शविल्याप्रमाणे छायांकित करावे. लेखनिकाने प्रश्नपत्रिका स्वतःसोडवू नये किंवा उमेदवारास उत्तराच्या निवडीबाबत कोणत्याही प्रकारे मागदर्शन वा सूचना करु नये.

४. लेखनिकाने परीक्षा कालावधीत प्रश्नोत्तराबाबत किंवा इतर कोणत्याही विषयी उमेदवाराशी चर्चा/गप्पा करु नयेत. तसेच इतर लेखनिकांशीही बोलू नये.

५. वरील उमेदवारांच्या सूचनांचे, प्रमाणपत्रावरील सूचनांचे तसेच उमेदवारांच्या प्रवेशपत्रावरील सूचनांचा लेखनिकाने काळजीपूर्वीक अभ्यास करावा व त्याचे काटेकोरपणे पालन करावे.

६. उपरोक्त सूचनांचे लेखनिक पालन करीत नाही किंवा पालन केले नाही असे आढळून आल्यास त्यांचेविरुध्द प्रचलित नियम/कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

-------------------------

# <u>लेखनिकाचे नियुक्तीपत्र</u>

| लेखनिकाने पासपोर्ट आकाराचा फोटो येथे चिकटवून त्यावर स्वतः स्वाक्षरी करावी. |
|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १. | लेखनिकाचे नांव | - | ------------------------------------------------ |
| २. | पदनाम | - | ------------------------------------------------ |
| ३. | कार्यालयाचा पत्ता | - | ------------------------------------------------ |
| ४. | लेखनिकाची शैक्षणिक अर्हता | - | ------------------------------------------------ |
| ५. | उमेदवार व लेखनिक एकाच विद्या शाखेचे आहेत का? | - | ------------------------------------------------ |
| ६. | असल्यास,लेखनिक उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एक पायरी/टप्पा कमी आहे का? | | ------------------------------------------------ |

उपरोक्त उमेदवार विहीत अटींची पूर्तता करीत असल्यामुळे त्यांची प्रस्तूत परीक्षेसाठी उमेदवाराचे लेखनिक म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. लेखनिकाने संबंधित उपकेंद्रावर परीक्षेच्या दिवशी सकाळी १०.०० वाजता उपस्थित राहून संबंधित उपकेंद्र प्रमुखांची भेट घ्यावी.

**<u>ठिकाणः-</u>** रत्नागिरी.
**<u>दिनांकः-</u>** / /२०१५

**निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा निवड समिती रत्नागिरी**

**<u>टिपः-</u> लेखनिकाने सदर नियुक्ती पत्रावर दर्शविलेल्या ठिकाणी पासपोट आकाराचा फोटो चिटकवून फोटोवर स्वतःची स्वाक्षरी करुन ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आस्थापना शाखेमध्ये सादर करावे.**

**<u>महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना - अ</u>**

प्रतिज्ञापन

नमूना - अ

(नियम ४ पहा)

मी श्री./श्रीमती./कुमारी ------------------------------------------------------------ -----------------------------

श्री.-------------------------------------------- यांचा/यांचीमुलगा/मुलगी/पत्नी, वय वर्षे, राहणार ------------

------------------------------------------------------------याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/करते, कि, (१) मी ------------------------------------------------------------ पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

(२) आज रोजी मला ------- (संख्या) इतकी मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ---------- आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

**<u>ठिकाणः-</u>**

**<u>दिनांकः-</u>** **अर्जदाराची सही**